03 DEC 2024 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्हॉटस्ॲप मेसेजव्दारे आता 'दीक्षांत'ची माहिती




अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा अर्ज भरण्यापासून ते निकालापर्यंत सर्वच गोष्टी विद्यार्थ्यांना ऑनलाईन दिल्या जातात. त्यात आता भर पडणार ती दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी व्हॉटसॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आठवण करून दिली जाणार आहे. पदवी प्रमाणपत्र स्विकारेपर्यंत वारंवार मेसेज केला जाणार आहे. जानेवारीमध्ये होणाऱ्या दीक्षांत समारंभाचे प्रक्षेपणही ऑनलाईन केले जाणार आहे.

विद्यापीठाने नॅक मूल्यांकनात राज्यात अव्वल येण्याचा मान मिळवला. संशोधनाच्या जागतिक क्रमवारीतही ठसा उमटवला आहे. देशातील अव्वल क्रमांकाचे संशोधक म्हणून प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची ओळख आहे. दर्जेदार शिक्षण, संशोधनात शिवाजी विद्यापीठाने इतर विद्यापीठांना मागे टाकत, विद्यार्थीभिमुख विद्यापीठ करण्याचा वारंवार प्रयत्न केला आहे. विद्यापीठातील परीक्षेचा निकाल ३० दिवसात लावून विद्यार्थ्यांना



**विद्यापीठ विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न**

विद्यापीठ अधिकाधिक विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाची संपूर्ण माहिती व्हॉटसॲपच्या माध्यमातून दिली जाणार आहे.
– डॉ. व्ही. एन. शिंदे
(कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

पुढील शिक्षण व नोकरीचा मार्ग रिकामा केला आहे. चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीमच्या माध्यमातून नियमित अभ्यासक्रमाबरोबर इतर अभ्यासक्रमाची पदवी घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यानंतर परीक्षेचा अर्ज ऑनलाईन भरून त्याची प्रिंट विद्यापीठात जमा करावी लागत होती. पुन्हा संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली. एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना ऑनलाईन पाठवल्या. यात अनेक ठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने विद्यापीठाने स्वत:चे एसआरपीडी ॲप तयार केले आहे. या ॲपतून यशस्वीपणे ऑनलाईन प्रश्नपत्रिका पाठवून परीक्षा घेतल्या जात आहेत. विद्यापीठाचा हा प्रयोग यशस्वी झाल्याने कौतुक होत आहे.

विद्यापीठाने प्रवेश, परीक्षा, दीक्षांत अर्ज भरण्यापासून ते पेमेंट गेट वेपर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन उपलब्ध केल्या आहेत. या सुविधांचे स्वागत होत आहे. स्वनिर्मित एसआरपीडीच्या माध्यमातून काही व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यातही विद्यापीठाने यश मिळवले आहे. प्रोफेशनल विद्यापीठाप्रमाणे पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरणे, पदवी प्रमाणपत्र प्रत्यक्ष,पोस्टातून मिळवण्यासाठी ऑनलाईन मेसेजद्वारे माहिती दिली जाणार आहे. विद्यार्थी प्रमाणपत्र, गुणपत्रक घेऊन जाईपर्यंत विद्यापीठ विद्यार्थ्यांना आठवणीचा मेसेज पाठवेल. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ जानेवारीमध्ये आहे. त्यामुळे परीक्षा विभागांतर्गत दीक्षांत समारंभाची तयारी सुरू असून विद्यार्थ्यांना व्हॉटस ॲपव्दारे माहिती दिली जात आहे.

**तंत्रज्ञानाच्या दुनियेत विद्यापीठ शंभर टक्के ऑनलाईनच्या मार्गावर**

तंत्रज्ञानाच्या दुनियेत विद्यापीठ शंभर टक्के ऑनलाईन होण्याचा पुर्णपणे प्रयत्न सुरू आहे. ट्रान्सफर सिटही विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाठवली जाते. विद्यार्थ्यांना एक लॉगईन देऊन त्यांची सर्व गुणपत्रक, पदवी प्रमाणपत्रही ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाणार आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना कोठेही कागदपत्रे घेऊन जाण्याची गरज भासणार नाही. नोकरीसाठीच्या मुलाखतीला, पुढील शिक्षणाला जाताना लॉगईनच्या माध्यमातून संबंधित संस्थेला कागदपत्रे दाखवता येणार आहेत.

03 DEC 2024
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था ही आदर्श

## डॉ. रविनंद होवाळ



कोल्हापूर : 'भारतीय संवैधानिक मूल्ये 'या विषयावरील व्याख्यानात बोलताना डॉ. रविनंद होवाळ.

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था ही आदर्श मूल्यव्यवस्था आहे. यासाठी आपणास फक्त अभिमान बाळगून चालणार नाही, तर प्रत्यक्षात कसे उतरवता येईल ते पाहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुणे येथील विचारवंत डॉ. रविनंद होवाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताह समारोप समारंभामध्ये 'भारतीय संवैधानिक मूल्ये' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, आपल्या देशाचे सामर्थ्य विविधतेतील एकतेमध्ये दिसून येते आणि हे बळ संविधानामधून प्राप्त झालेले आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, विद्यापीठामधील अधिविभाग आणि महाविद्यालयांमध्ये संविधानाचे वाचन सुरू करावे. त्याचे चिंतन केले पाहिजे आणि अनुभवाने ते समजावून घेणे आवश्यक आहे.

याप्रसंगी पोस्टर प्रदर्शन स्पर्धेमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रथम पारितोषिक मर्सी फर्नांडिस आणि पुण्यश्री रंजन, द्वितीय पारितोषिक बनसी होवाळे आणि ऐश्वर्या कदम तर तृतीय पारितोषिक ऐश्वर्या मरूतवर यांनी प्राप्त केले.

प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्ण महाजन व अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. विभा अंत्रेडी, डॉ. संजय कुबल, डॉ. गजानन पळसे, ॲड. अनुष्का कदम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
पुढारी

# भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान

## प्रा. डॉ. रवींद्र भणगे; दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विशेष व्याख्यान



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांमुळे भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. रवींद्र भणगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील होते. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे उपस्थित होते. डॉ. भणगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार आहेत. भारतीय राज्यघटनेचे महत्त्व उद्देश पत्रिकेतून प्रतीत होते.

संविधानाचे महत्त्व गेल्या ७५ वर्षांत अबाधित आहे. देशामध्ये न्याय व समानतेवर आधारित नवनिर्मितीचे काम संविधानाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. आज भारत देशाने विकसित देशाच्या पंक्तीमध्ये स्थान मिळविले आहे ते केवळ संविधानाच्या माध्यमातून झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
पुण्यनगरी

# भारतीय संविधान जगात आदर्श : डॉ. भणगे

कोल्हापूर : भारतीय राज्यघटना लोकांनी लोकांसाठी तयार करून लोक सार्वभौमत्व असल्याने त्याची सुरुवात स्वतःपासून केली. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय मूल्यांमुळे भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. रवींद्र भणगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील होते, तर उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

प्रा. डॉ. भणगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार आहेत. भारतीय राज्यघटनेचे महत्त्व उद्देशपत्रिकेतून प्रतीत होते. या संविधानाला दि. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी मान्यता मिळाली असून, त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचे महत्त्व सांगताना केलेले भाषण आजही प्रासंगिक आहे, असेही ते म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
तरुण भारत

# भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान : डॉ. रविंद्र भणगे

कोल्हापूर : संविधानातील स्वातंत्र,समता,बंधुता आणि न्याय मूल्यांमुळे भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान आहे, असे प्रतिपादन डॉ. रविंद्र भणगे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनाच्या निमित्त "भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल " या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र–संचालक डॉ. के. बी. पाटील होते. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे उपस्थित होते. डॉ. भणगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे शिल्पकार आहेत. डॉ. आंबेडकर यांनी संविधानाचे महत्व सांगताना केलेले भाषण आजही प्रासंगिक आहे. प्रास्ताविक डॉ. सचिन भोसले यांनी केले. डॉ. सुर्यकांत गायकवाड यांनी स्वागत केले. परिचय डॉ. नितीन रणदिवे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण लोंढे यांनी केले. आभार डॉ. सी. ए. बंडगर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षांना ३७,८३५ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी विविध अभ्यासक्रमांच्या १६८ विषयांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १८५ परीक्षा केंद्रांवर झाल्या, या परीक्षांसाठी ३७,८३५ विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ३७ हजार ८३५ विद्यार्थी हजर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ३७ हजार ८३५ विद्यार्थी हजर होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील १८५ केंद्रांवर बीए. बी.कॉम., बीएस्सी., बीबीए, बीसीए, बीडीएस, बीई., बी.टेक., बी.कॉम (आयटी) सह विविध अभ्यासक्रमांच्या १६८ विषयांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. कोल्हापूर (४८), सांगली (०३) व सातारा (०४) असे तीन जिल्ह्यांतून ५५ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

0 3 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यसबा करंडक १४ डिसेंबरला

## आंतरशालेय कला महोत्सवात रंगणार विविध स्पर्धा

कोल्हापूर, ता. २ : येथील प्रसिद्ध दिग्दर्शक, शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य यशवंत भालकर यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त १४ डिसेंबरला यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव रंगणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात हा महोत्सव होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सव होईल. चित्रकला, मातीकाम, एकपात्री अभिनय, निबंधलेखन, समूह गायन, समूह नृत्य अशा सहा कला प्रकारांमध्ये हा महोत्सव होणार आहे, अशी माहिती नृत्य दिग्दर्शक संग्राम भालकर यांनी दिली. चार डिसेंबरपर्यंत शाळांनी नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक टी. एम चौगुले, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव-भालकर, संदीप जाधव, यसबा करंडक सदस्य भूषण पाठक, रितेश सुतार, आशिष हेरवाडकर, ऋषीकेश कोडनाईक, शुभम निंबाळकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
लोकमत

# यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव १४ डिसेंबरला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त १४ डिसेंबरला यसबा करंडक हा आंतरशालेय कला महोत्सव होत आहे. विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशन यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठात हा महोत्सव होईल.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला, मातीकाम, एकपात्री, निबंधलेखन, समूहगायन, समूहनृत्य अशा सहा कला प्रकारांमध्ये हा कला महोत्सव रंगणार आहे. नृत्यदिग्दर्शक संग्राम भालकर यांच्यासह विद्यार्थी विकास विभाग प्र. संचालक टी. एम. चौगुले, फौंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव भालकर, संदीप जाधव, रितेश सुतार, आशिष हेरवाडकर, ऋषीकेश कोडनाईक, शुभम निंबाळकर, शिवम गेंजगे, सैफ बारगीर, आकाश लिगाडे, मैथिली सरनाईक हे संयोजन करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 DEC 2024
पुण्यनगरी

# 'यसबा करंडक' महोत्सव १४ रोजी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य, १४ विक्रमी पुरस्कार विजेते, चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त तिसऱ्या आंतरशालेय कलामहोत्सव यसबा करंडकचे आयोजन दि. १४ रोजी शिवाजी विद्यापीठ येथे केल्याची माहिती संकल्पक दिग्दर्शक संग्राम भालकर यांनी दिली. याही वर्षी विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा करंडक होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा कलामहोत्सव बहरणार आहे. चित्रकला, मातीकाम, एकपात्री, निबंध लेखन, समूह गायन, समूह नृत्य अशा सहा कला प्रकारांमध्ये हा कलामहोत्सव रंगणार आहे. याप्रसंगी संचालक, विद्यार्थी विकास विभाग प्र. संचालक टी. एम. चौगुले, फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव भालकर, संदीप जाधव, सदस्य भूषण पाठक, रितेश सुतार, आशीष हेरवाडकर, ऋषीकेश कोडनाईक, शुभम निंबाळकर, शिवम गेंजगे, सैफ बारगीर, आकाश लिगाडे, मैथिली सरनाईक आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
तरुण भारत

# विद्यापीठ जलतरण स्पर्धेत केआयटीला जनरल चॅम्पियनशिप

## शाहू कॉलेजला उपविजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आंतरविभागीय पुरूष व महिला जलतरण स्पर्धा शाहू कॉलेजमधील राष्ट्रीय जलतरणपटू सागर पाटील जलतरण तलावात झाल्या. जनरल चॅम्पियनशिप केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजने पटकावला. उपविजेतेपद शाहू कॉलेजने मिळवले. तर तृतीय क्रमांक मुधोजी महाविद्यालय फलटण यांनी मिळवले.

जलतरण स्पर्धेतील वैयक्तिक चॅम्पियनशिप पुरूष गटात शिवाजी विद्यापीठ पुजीपीजी विभाग धैर्यशील भोसलेने ३६ गुण मिळवले तर महिला गटात वैयक्तिक चॅम्पियनशिप मुधोजी महाविद्यालयातील रूचिता कदमने मिळवली. फलटण या खेळाडूने ३८ गुण प्राप्त करून मिळवली. महिला गटामध्ये सुबिया रहीमखान मुलानी हिने ४०० मीटर फ्रीस्टाइल प्रथम क्रमांक, ५० मीटर बटरफ्लायमध्ये द्वितीय क्रमांक, ५० मीटर फ्रीस्टाइल तृतीय क्रमांक, १०० मीटर बँक स्टोक द्वितीय, २०० मीटर बँक स्ट्रोक द्वितीय, २०० मीटर फ्रीस्टाइल द्वितीय क्रमांक, २०० मीटर आय. एम. द्वितीय क्रमांक, ४०० मीटर आय.एम प्रथम क्रमांक, ८०० मीटर प्रथम क्रमांक, १५०० मीटर प्रथम क्रमांक पटकाविला. पुरुषांच्या गटामध्ये तेजस माने या खेळाडूने १०० मीटर बटरफ्लाय प्रथम क्रमांक, ५० मीटर बटरफ्लाय द्वितीय क्रमांक, २०० मीटर बटरफ्लाय प्रथम क्रमांक २०० मीटर फ्रीस्टाइल द्वितीय क्रमांक ४०० मीटर फ्रीस्टाइल द्वितीय क्रमांक पटकावला. ऋषिकेश पाटील या खेळाडूने ५० मीटर बँक स्ट्रोक प्रथम क्रमांक, १०० मीटर बँक स्ट्रोक द्वितीय क्रमांक, ४०० मीटर आय.एम. द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर ओमकार पाटील या खेळाडूने ८०० मीटर फ्रीस्टाईल प्रथम क्रमांक, पंधराशे मीटर फ्रीस्टाईल द्वितीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. शरद बनसोडे यांच्या शुभहस्ते झाले. बक्षीस वितरण समारंभ प्रभारी प्राचार्य डॉ.डी. आर. भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. उमेश शेळके, डॉ. के. व्ही. गायकवाड डॉ. गणेश लवंगारे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विक्रमसिंह नांगरे, प्रा. सविता मांजगावकर, प्रशिक्षक श्री. मानसिंग पाटील, अंकुश पाटील, अमर पाटील, संतोष डोकरे, अर्जुन रावळ, संकेत माने, मोनिका कोरवी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 DEC 2024
सकाळ

# ओंकार महाविद्यालयाचे मैदानी स्पर्धेत यश

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठात झालेल्या कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेत येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश मिळविले. ओंकार पोवारने ८०० मीटर धावण्यात सुवर्णपदक, तर १५०० मीटर धावण्यात ब्राँझपदक पटकावले. मुलांच्या ४०० मीटर रिले संघाने ब्राँझपदक मिळविले. संघात ओंकार पोवार, निरंजन पाटील, श्रेयस पाटील, भूषण कदम व संतोष राणे यांचा समावेश होता. खेळाडूंची ३ ते ५ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उमेश सावंत याने भालाफेक स्पर्धेत पाचवा, भूषण कदमने दहा हजार मीटर धावण्यात चौथा क्रमांक पटकावला. मुलांच्या शंभर मीटर रिले संघाने पाचवा क्रमांक मिळविला. संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन, तर सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन लाभले.